## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१५-२०१६/ 1055          दिनांक : 20/6/2015

परिपत्रक

**विषय:- गटस्तरीय खुली सांघिक समरगीत / स्फुर्तीगीत स्पर्धा**

संदर्भ:- मका/कार्यक्रम/२०१५-१६/८२० दि.०७/०५/२०१५

मंडळाच्या सर्व संबधित अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, समरगीत /स्फुर्तीगीत स्पर्धा ही गटस्तरावर माहे जुलै मध्ये त्यानंतर ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येत होती, त्या स्पर्धेमध्ये गट स्तरावरील प्रथम क्रमांकाने विजयी संघाना सहभागी करुन घेण्यात येत होते.

सन २०१५-१६ या चालू आर्थिक वर्षापासून समरगीत स्पर्धा फक्त गटस्तरावरच आयोजित करण्याबाबत वरील संदर्भीय परिपत्रकान्वये यापुर्वीच कळविण्यात आलेले आहे. यावर्षी पासून दरवर्षी गटस्तरीय समरगीत / स्फुर्तीगीत स्पर्धा दिनांक ९ ऑगस्ट (ऑगस्ट क्रांतीदिन) रोजी आयोजित करण्यात यावी. राज्यस्तरीय समरगीत स्पर्धा या वर्षापासून बंद करण्यात आलेली आहे.

स्पर्धेच्या नियम व अटी खालील प्रमाणे राहतील.

१. मंडळाने तयार केलेल्या समरगीत/स्फुर्तीगीतांच्या यादीतील कोणतेही एक गीत सादर केले पाहिजे. समरगीत/ स्फुर्तीगीत हे वीररस प्रधान असले पाहिजे. ( गीतांची यादी गटकार्यालयाकडे उपलब्ध आहे )
२. समरगीतांची/स्फुर्तीगीतांची वेळ कमीतकमी ८ मिनिटे व जास्तीत जास्त १० मिनीटांची राहिल.
३. सहभागी कलाकार हे १८ वर्षे किंवा त्याहून जास्त वयोगटातील असावेत.
४. समरगीत/स्फुर्तीगीत स्पर्धेत कोणत्याही कामगार किंवा कामगार कुटुंबिय कलाकारास फक्त एकाच संघात भाग घेता येईल.
५. समरगीत/स्फुर्तीगीत स्पर्धेत कमीत कमी ८ संघानी भाग घेणे आवश्यक राहील. या पेक्षा कमी संघानी भाग घेतल्यास पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाची फक्त दोन बक्षिसे देण्यात यावीत.
६. संघामध्ये कमीतकमी ८ व जास्तीत जास्त १२ कलाकार असावे.
७. या स्पर्धेमध्ये कामगार कल्याण केंद्रांच्या, केंद्रांतर्गत कामगार वसाहतीच्या संघाना तसेच मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या आस्थापनेच्या संघांना प्रवेश देण्यात यावा. आस्थापनेच्या संघानी स्पर्धकांची नावे आस्थापनेच्या दाखल्यासह सादर करणे बंधनकारक राहील.
८. या स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या संघातील एकूण कलावंतापैकी कमीतकमी ५० टक्के कलावंत कामगार व कामगार कुटुंबिय असणे आवश्यक आहे. वादकांना ही अट राहणार नाही.
९. कामगार कल्याण केंद्र व कामगार वसाहतीच्या संघातील कलावंताना कामगार कल्याण केंद्राचे सभासद असणे आवश्यक आहे.

२...

१०. समरगीत/स्फुर्तीगीतातील भाग घेणारे केंद्र व वसाहतीतील संघ प्रत्यक्ष केंद्राचे सभासद असावेत. बाहेरील संस्थांचे तयार संघ केंद्र व वसाहतीच्या नावाने सादर करण्यात येऊ नये. असे घडल्यास संघाचा सादरीकरण खर्चासह सर्व खर्च संबंधित केंद्र प्रमुखांकडून वसूल करण्यात येईल.

११. समरगीत/स्फुर्तीगीत स्पर्धेत पेटी,तबला,डफ,खंजिरी/तुतारी,झांज,चिपळ्या,तुणतुणे यासारख्या वाद्यांचा वापर करण्यात यावा. इलेक्ट्रॉनिक वाद्ये वापरू नयेत.

१२. समरगीत/स्फुर्तीगीत स्पर्धेच्या परिक्षकांचा निर्णय अंतिम समजला जाईल व तो बंधनकारक राहील.

१३. या स्पर्धेकरिता केंद्र व वसाहती व्यतिरिक्त आस्थापनांच्या संघाकडून नाममात्र प्रत्येकी रु.५०/- (रुपये पन्नास) फक्त प्रवेश फी घेण्यात यावी व ती मंडळास जमा करण्यांत यावी.

१४. केंद्र, वसाहती व आस्थापनाच्या संघांना सादरीकरण खर्च व स्पर्धेच्या ठिकाणी जाण्यायेण्याचा कमीतकमी दराचा प्रवासखर्च मंडळाच्यावतीने देण्यात येईल.

वरील प्रमाणे सर्व नियम व अटींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन गट प्रमुखांनी स्पर्धा आयोजन करावे. विभाग प्रमुखांनी सदर परिपत्रकाच्या अमंलबजावणीबाबत योग्यती कार्यवाही करावी. सदरचे परिपत्रक चालू आर्थिक वर्षापासून पुढील आदेश निघेपर्यंत अमलांत राहिल.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) सर्व अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

२) प्र. सहायक कल्याण आयुक्त / सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागिय कार्यालये/ कामगार क्रिडा भवन, मुंबई

३) सहाय्यक लेखा अधिकारी सर्व विभागीय कार्यालये

४) कामगार कल्याण अधिकारी, १८ गट कार्यालये ★★★

५) केंद्र प्रमुख, सर्व केंद्र

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.